# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 12 October 2025
## Time 7.10 AM to 7.20 AM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- पीएम धनधान्य कृषी योजना आणि कडधान्य उत्पादन आत्मनिर्भरता मोहिमेला पंतप्रधानांच्या हस्ते प्रारंभ
- कृषी क्षेत्रात कृत्रीम बुद्धिमत्तेचा वापर गेम चेंजर ठरेल–मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन
- शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा छत्रपती संभाजीनगर इथे हंबरडा मोर्चा
- अमरावतीच्या "महाराष्ट्र पक्षिमित्र" संस्थेचा जीवन गौरव पुरस्कार छत्रपती संभाजीनगर इथले डॉ. दिलीप यार्दी यांना जाहीर

आणि

- वेस्ट इंडीजविरुद्ध दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारताचा पहिला डाव ५१८ धावांवर घोषित

****

पीएम धनधान्य कृषी योजना आणि कडधान्य उत्पादनात आत्मनिर्भरता मोहिमेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काल प्रारंभ झाला. नवी दिल्लीत झालेल्या या कार्यक्रमात कृषी, पशुसंवर्धन, मत्स्यपालन आणि अन्नप्रक्रिया क्षेत्रातल्या विविध प्रकल्पांचंही पंतप्रधानांनी उद्घाटन केलं. कडधान्य उत्पादनात आत्मनिर्भरता प्राप्त करण्यासाठी ही मोहीम राबवण्यात येणार असून, या योजनेअंतर्गत तूर, उडीद, मसूर या कडधान्यांचं उत्पादन वाढवलं जाईल. या योजनेत पशूधनावरही विशेष लक्ष दिलं जाणार असल्याची माहिती पंतप्रधानांनी यावेळी दिली. ते म्हणाले...

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

गेल्या अकरा वर्षात कृषी क्षेत्रात केलेल्या सुधारणांचा पंतप्रधानांनी यावेळी आढावा घेतला. या काळात अन्नधान्य उत्पादन ९०० लाख मेट्रिक टन वाढलं, फळभाज्या उत्पादन ६४० लाख मेट्रिक टनापेक्षा जास्त वाढलं, सहा मोठ्या खत उत्पादक कंपन्या उभ्या राहिल्या, मत्स्योत्पादन, मध उत्पादन दुप्पट झालं, कृषीमालाची निर्यात दुप्पट झाली असं त्यांनी सांगितलं.

केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी यावेळी बोलतांना, पंतप्रधानांच्या स्वदेशीच्या आवाहनाला शेतकरीही प्रतिसाद देत असल्याचं सांगितलं.

**

या योजनेच्या शुभारंभाचा राज्यस्तरीय कार्यक्रम पुण्यात, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभागृहात पार पडला. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यावेळी उपस्थित होते. केंद्र तसंच राज्य शासन शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून शेतकरी सक्षम व्हावा यादृष्टीने काम करत असल्याचं, भरणे यांनी सांगितलं.

या योजनेत देशातल्या १०० जिल्ह्यांची निवड करण्यात आली असून, त्यात राज्यातल्या छत्रपती संभाजीनगर, बीड आणि नांदेडसह नऊ जिल्ह्यांचा समावेश आहे. या जिल्ह्यांसह राज्यात सर्वत्र या कार्यक्रमाचं प्रसारण करण्यात आलं, याबाबत अधिक माहिती देणारा हा वृत्तांत..

**नांदेड जिल्ह्यातले शेतकरी भगवान इंगोले यांना या कार्यक्रमासाठी दिल्लीत आमंत्रित करण्यात आलं होतं, इंगोले हे आपल्या शेती उत्पादनांसह या कार्यक्रमात सहभागी झाले. पंतप्रधानांनी भेट घेऊन आपल्या उत्पादनांची माहिती घेतल्याचं इंगोले यांनी सांगितलं. ते म्हणाले…**

**बाईट – शेतकरी भगवान इंगोले**

**नांदेड इथले कृषी शास्त्रज्ञ डॉ संदीप जायभाये यांच्यासह अनेक तज्ज्ञांशी काल केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान तसंच राज्यमंत्री भगीरथ चौधरी यांनी चर्चा केली. सेंद्रीय शेती करणाऱ्यांना अनुदान देण्याबाबत सरकार अनुकूल असल्याचं, या चर्चेतून समजल्याचं, डॉ जायभाये यांनी सांगितलं. ते म्हणाले….**

**बाईट – कृषी शास्त्रज्ञ डॉ संदीप जायभाये**

**छत्रपती संभाजीनगर इथं कृषी विज्ञान केंद्रात या कार्यक्रमाचं थेट प्रसारण करण्यात आलं. उपस्थित तज्ज्ञांनी या कार्यक्रमानंतर शेतकऱ्यांना विविध विषयावर मार्गदर्शन केलं.**

**बीड इथं जिल्हा नियोजन समिती सभागृहात हा कार्यक्रम दाखवण्यात आला. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याहस्ते यावेळी शेतकऱ्यांना मृदा आरोग्य पत्रिकांचं वितरण करण्यात आलं.**

**परभणी येथील कृषी विज्ञान केंद्रात दूरदृष्य प्रणालीव्दारे या कार्यक्रमाचं प्रसारण दाखवण्यात आलं. जिल्ह्यातील शेतकरी, महिला शेतकरी, कृषी उद्योजक मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित होते. उपस्थित शेतकऱ्यांपैकी सरिता जाधव आणि पंढरीनाथ इक्कर यांनी आपलं मनोगत या शब्दांत व्यक्त केलं.**

**बाईट – शेतकरी पंढरीनाथ इक्कर, सरिता जाधव**

****

कृषी क्षेत्रात कृत्रीम बुद्धिमत्तेचा वापर गेम चेंजर ठरेल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते काल मुंबईत एचपी आणि इंटेल यांच्या ‘एचपी ड्रीम अनलॉक्ड’ या उत्सवाचं उद्घाटन केल्यानंतर बोलत होते. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून समाजात साक्षरता आणि समता निर्माण होऊ शकते, असं सांगत, हे तंत्रज्ञान प्रत्येकाच्या कल्पनेला आकार देऊ शकतं, असं मुख्यमंत्री म्हणाले.

****

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ५७ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त राज्यातून मोठ्या संख्येनं आलेल्या भाविकांनी काल अमरावती इथल्या श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रमात तुकडोजी महाराजांना मौन आदरांजली अर्पण केली. दरम्यान, नागपुरात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाने तुकडोजी महाराजांच्या गीत गायनाच्या विश्वविक्रमाची नोंद केली.

****

शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफीच्या मागणीसाठी माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात काल छत्रपती संभाजीनगर इथं हंबरडा मोर्चा काढण्यात आला. राज्य सरकारचं पॅकेज फसवं असल्याची टीका करत ठाकरे यांनी, शेतकऱ्यांसाठी संपूर्ण कर्ज माफीच्या मागणीचा पुनरुच्चार केला. ते म्हणाले...

**बाईट – माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे**

राज्यात साडे पाच लाख शेतकऱ्यांना सौर पंप दिलेले असून, पुढच्या दीड वर्षांत आणखी पाच लाखावर शेतकऱ्यांना राज्य सरकार सौर पंप देणार असल्याचं, इतर मागासवर्ग आणि अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे यांनी म्हटलं आहे. काल छत्रपती संभाजीनगर इथं `पर्यावरणीय बदलः सध्याची स्थिती आणि आव्हानं` या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते. भारताला जगभरात पहिल्या क्रमांकाची अर्थव्यवस्था करण्याच्या प्रयत्नातही हे पाऊल महत्त्वपूर्ण योगदान देईल, असा विश्वास सावे यांनी व्यक्त केला.

****

क्रिकेट

भारत आणि वेस्ट इंडिज क्रिकेट संघादरम्यान नवी दिल्लीत सुरु असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात काल दुसऱ्या दिवशी भारतानं आपला पहिला डाव पाच बाद ५१८ धावसंख्येवर घोषित केला. कर्णधार शुभमन गिल १२९ धावांवर नाबाद राहिला. यासोबतच त्याने एका कॅलेंडर वर्षात पाच शतकं करण्याच्या विराट कोहलीच्या विक्रमाचीही बरोबरी केली. दरम्यान वेस्ट इंडीजचा संघ आज आपल्या पहिल्या डावात कालच्या चार बाद १४० धावसंख्येवरून खेळ पुढे सुरू करेल.

****

बीसीसीआयच्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ जाहीर झाला असून, यात छत्रपती संभाजीनगरचा अंकित बावणे महाराष्ट्राचं कर्णधारपद भुषवणार आहे. तर बीडच्या सौरभ नवले याची या संघात यष्टिरक्षक म्हणून निवड झाली आहे. महाराष्ट्र क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष सचिन मुळे यांनी ही माहिती दिली.

****

अमरावती च्या "महाराष्ट्र पक्षिमित्र" संस्थेचा यंदाचा पक्षिमित्र जीवन गौरव पुरस्कार छत्रपती संभाजीनगर इथले डॉ. दिलीप यार्दी यांना जाहीर झाला आहे. स्मृतिचिन्ह, सन्मान पत्र आणि रोख रक्कम असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. येत्या एक आणि दोन नोव्हेंबर दरम्यान अमरावती इथं नियोजित ३८ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनात हे पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान करण्यात येणार आहेत.

****

भविष्यातील पाण्याच्या गरजेप्रमाणे नियोजन करण्याचं आवाहन छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केलं आहे. काल जिल्हा

आकस्मिक पाणी आरक्षण बैठकीत ते बोलत होते. भविष्यातील गरज पाहता काही तालुक्यांसाठी पाणी आरक्षित करण्याची सूचना स्वामी यांनी केली.

****

राष्ट्रीय स्वयसेवक संघाच्या शतकपूर्तीच्या औचित्याने परभणी शहरात काल भव्य मेळावा पार पडला. त्यानिमित्त शहरात पथ संचलन करण्यात आलं. संघाचे सह सरकार्यवाह अरुण कुमार आणि प्रमोद जाधव यांनी उपस्थित स्वयंसेवकांना मार्गदर्शन केलं. छत्रपती संभाजीनगर इथंही काल पथसंचलन करण्यात आलं. यावेळी सह सरकार्यवाह रामदत्त चक्रधर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केलं.

****

लातूर जिल्ह्यातल्या अहमदपूर इथं भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसराचं नगरपरिषदेमार्फत सुशोभीकरण करण्यात येत आहे. या कामाची सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी काल पाहणी केली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून त्यांनी अभिवादन केलं.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ३१ ऑक्टोबरपर्यंत मोबाईल कॅन्सर व्हॅनद्वारे कर्करोग तपासणी करण्यात येत आहे. काल फुलंब्री तालुक्यात बाबरा इथं १२९ महिलांची तपासणी करण्यात आली.

****